म. गृ. नि. व क्षे. प्राधिकरण
आवक क्र. ET-331
दिनांक 06 DEC 2019
अधिकाऱ्याची सही

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्या अंतर्गत सर्व विभागीय मंडळांतील गट "अ" आणि गट "ब" (वर्ग-१ व वर्ग-२) संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ स्थापन करण्याबाबत.....

# महाराष्ट्र शासन

गृहनिर्माण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: बदली-२०१९/प्र.क्र.११५/गृनिभू
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
३ रा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३ डिसेंबर, २०१९

उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा.

वाचा :- १) शासन निर्णय गृहनिर्माण विभाग, क्र. नियुक्ति २०१९/प्रक्र.६९(१)/गृनिभू, दि.१७.०७.२०१९
२) शासन निर्णय सा.प्र. वि. क्र.एसआरव्ही-२०१४/ प्र.क.२६/१२,दि.३१.०१.२०१४

**प्रस्तावना :-**

दि.१७/०७/२०१९ च्या संदर्भांकितच क्र.१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्या अंतर्गत सर्व विभागीय मंडळांतील (म्हाडा) गट "अ" आणि गट "ब" (वर्ग-१ व वर्ग-२) संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या नियतकालिक तसेच मुदतपूर्व व बदल्यांचे अधिकार शासनास आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) क्र.८२/२०११ मध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यासाठी शासन सेवेतील गट-अ , गट-ब व गट-क मधील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ स्थापन करण्याचा निर्णय संदर्भांकित क्र.२ च्या शासननिर्णयान्वये घेण्यात आलेला आहे, त्यानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्याअंतर्गत सर्व विभागीय मंडळातील गट-अ व गट -ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्याअंतर्गत सर्व विभागीय मंडळातील गट-अ व गट -ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी मंत्रालयीन प्रशासकीय स्तरावर खालीलप्रमाणे नागरी सेवा मंडळ स्थापन करण्यात येत आहे.

## नागरी सेवा मंडळ (१)

| | | |
|---|---|---|
| १ | अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव,गृहनिर्माण विभाग मंत्रालय | अध्यक्ष |
| २ | उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा/प्रा. | सदस्य |
| ३ | सचिव/सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |

२. नागरी सेवा मंडळ (१), महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणं व त्याअंतर्गत सर्व विभागीय मंडळातील गट-अ व गट -ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करील.

३. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार बदल्यांच्या प्रस्तावावर नागरी सेवा मंडळ (१) शिफारशी करील.

४. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९१२०३१७१३४१२४०९ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramchandra Dhanawade

Digitally signed by Ramchandra Dhanawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf4fd1e4249e6612552db1552e149b0688899cac7ecc37ca9fbf60ec7d9103d6, serialNumber=5b10ebd8bee2e77f1e579c83aa5378f02ae01b1765ccdd10f83cb76cd8bbe016, cn=Ramchandra Dhanawade
Date: 2019.12.03 17:16:19 +05'30'

(रा. कों. धनावडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२) मा. मंत्री ( गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०००३२
३) मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
५) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
६) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
७) मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
८) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
९) सर्व मुख्य अधिकारी, मुंबई/कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ
१०) सर्व उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११) निवडनस्ती, गृनिभू कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२